# उपवनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांचे कार्यालय

सेनापती बापट मार्ग, सिम्बायोसिस कॉलेज समोर, पुणे-४११ ००४

दूरभाष क्रमांक : ०२० २५६६ ०५९३ ई-मेल : dycfpune@gmail.com


विषय- वन (संवर्धन) अधिनियम १९८० चे कलम २ अंतर्गत १७.२५ हेक्टर इतके वनक्षेत्र प्रस्तावीत ४०० के.व्ही.जेजूरी ते हिंजवडी विदयुत वाहिनी टाकणे कामी वळतीकरणाचा प्रस्ताव.

**(FP/MH/TRANS/9859/2015)**

जा.क्र.: कक्ष-६/जमीन/एफसीए- /2024 /२०१५-२०१६

पुणे- ४११ ००४, दिनांक : 23 / ०६/२०१५

प्रति,

Executive Engineer,
EHV Construction Division-2,Pune
Administrative Building,1st Floor,
925,Kasba Peth,Pune-11

<u>संदर्भ</u> – कार्यकारी अभियंता,ईव्हीएम,कंन्ट्रशन डिव्हीजन-२ पुणे यांचेकडील पत्र क्र.EE /EHV /Const /DN-2 /PN/562 dt.13/4/2015

उपरोक्त विषयांकित प्रकरणी जेजुरी ते हिंजवडी वनक्षेत्रातून ४०० के.व्ही. विदयुत लाईन टाकणेकामी १७.२५ हेक्टर वनक्षेत्र वळतीकरणाचा, भारतीय वन (संवर्धन) अधिनियम १९८० चे कलम २ अंतर्गत प्रस्ताव संदर्भिय पत्रान्वये आपण या कार्यालयास सादर केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी केली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

१. प्रस्तावात पान क्रमांक नमूद करावेत.
२. प्रकल्पासाठी आवश्यक असणारे वनक्षेत्र कमीत कमी असल्याबाबत जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.
३. वन अधिकार कायदा २००६ अंतर्गत शासनाने विहित केलेल्या नमुन्यातील जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र प्रस्तावात जोडण्यात यावे. (सोबत विहित नमुन्याची प्रत माहितीस्तव जोडली आहे.)
४. प्रस्तावातील फॉर्म ए, भाग- १ मध्ये प्रकल्पा अंतर्गत निर्माण होणा-या रोजगार निर्मिती बाबत नमूद करावे.
५. प्रस्तावात प्रकल्पा बाबतची Project Note जोडण्यात यावी.
६. प्रकल्पासाठी आवश्यक असणा-या वनेत्तर क्षेत्राची यादी साक्षांकित करुन सादर करण्यात यावी.

७. प्रत्येक स्वाक्षरीच्या खाली स्वाक्षरीकर्त्याचे नाव पदनामासह लिहण्यात यावे तसेच कार्यालयाचा शिक्का देखील मारण्यात यावा.

८. प्रमाणपत्र ३१- पुरातत्व विभागाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

९. प्रकल्पासाठी प्रस्तावीत वनक्षेत्रापासुन संरक्षित क्षेत्राचे अंतर दर्शविणारा नकाशा (टोपोशिट) प्रस्तावात जोडण्यात यावे.

१०. प्रमाणपत्र क्र.६ मध्ये केंद्र शासनाची मागदर्शक सुचना क्रमांक ११-६८/२०१४/एफसी (पार्ट) दिनांक ११/७/२०१४ अन्वये दुप्पट पर्यायी वनीकरणाचा खर्च भरण्यास तयार असलेबाबत हमीपत्र सादर करण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे त्रुटींची पुर्तता करुन परिपुर्ण प्रस्ताव ८ प्रतीत या कार्यालयास सादर करावा जेणे करुन आपला प्रस्ताव योग्य त्या शिफारसीसह केंद्र शासनाच्या मंजूरीसाठी यथोचित मार्गाने सादर करता येणे शक्य होईल.

सहपत्र- वरील प्रमाणे

(सत्यजित गुजर )
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग, पुणे

O/c 23/6

प्रतिलिपी - उपविभागीय वनअधिकारी,भोर उपवनविभाग,भोर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रतिलिपी - वनपरिक्षेत्र अधिकारी,सिंहगड/पौड यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
२.००. प्रकरणी वनक्षेत्रामध्ये कोणतेही वनेत्तर काम होणार नाही याची दक्षत घ्यावी.